## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

**टोल फ्री क्रमांक :१०७७** **दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१,** **Email id - collector.pune@maharashtra.gov.in**

जि.का./आ.व्य./कावि/१७६/२०२१

दिनांक :- २१/०२/२०२१

वाचले:

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७,
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३. आपत्तीव्यवस्थापनकायदा २००५ चे कलम ३० , ३३ , ३४ , ४१ व कलम ५१,
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०.१४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीची अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/१७९४/१८१८/२३९९/२३८८/२८६५/२०२० दि.२३ जुन २०२०, दि. २५ जुन २०२०, दि.२८ ऑगस्ट, २०२०, दि.२६ ऑगस्ट २०२०, दि.२३ सप्टेंबर २०२०,
७. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/२५१४/२०२० दि.०४ सप्टेंबर २०२०
८.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक ३०/१०/२०२० रोजीचे आदेश.
९. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.सा.प्र.२/आरआर/५१/२०२१, दि.०५.०१.२०२१
१०.उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं- संकीर्ण ८२२०/ प्र.क्र.२२४/सा.का.४, दि.०५/०१/२०२१.
११. मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक 29/01/2021 रोजीचे आदेश.
१२. मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. १६ फेब्रुवारी २०२१ रोजीचे व्ही. सी. मधील सूचना
१३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रं.कोरोना-२०२०/सीआर क्रं.८५/अेअे-५ दि.१७.०२.२०२१
१४. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./ आ.व्य./कावि/१५८/२०२१ दि.१८ फेब्रुवारी २०२१
१५. मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०२/२०२१ रोजी झालेली बैठक

---

**विषय :- कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने पारीत केलेले आदेश, निर्देश, SOP इत्यादींचे प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**आदेश:**

**ज्याअर्थी,** उपरोक्त वाचा. २ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० प्रसिद्ध केले असून यातील नियम क्रं. ३ नुसार कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्याचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

**ज्याअर्थी,** संदर्भ क्रं.4 च्या अनुषंगाने संदर्भ क्र.६ अन्वये पुणे जिल्हयात कोव्हिड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा कालावधी दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत वाढविला आहे व या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्रं.४ ते ६ मध्ये नमूद आदेशान्वये तसेच या कार्यालयाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

**आणि, ज्याअर्थी,** दि.२१ फेब्रुवारी २०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेचे अनुषंगाने पुणे जिल्हयाचे मा. खासदार, मा.आमदार, मा.विभागीय आयुक्त,मा.आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका, जिल्हाधिकारी, पुणे, महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे , मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद पुणे , मा.महापौर, पुणे इतर मान्यवर यांच्यासमवेत झालेल्या बैठकीमध्ये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

**त्याअर्थी** मी **डॉ.राजेश देशमुख,** जिल्हाधिकारी पुणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तालुका स्तरावर उपाय योजना करणेसाठी खालील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेबाबत आदेश देत आहे.

१. तालुका स्तरावर कोरोना १९ विषाणुच्या अनुषंगाने उपाययोजना करणेसाठी उपविभागीय अधिकारी हे **Incident Commander** म्हणुन काम पाहतील त्यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव | कार्यालयाचे नाव | समितीमधील पद |
|---|---|---|---|
| १ | उपविभागीय अधिकारी | उपविभाग | अध्यक्ष |
| २ | उपविभागीय पोलीस अधिकारी | उपविभाग | सदस्य |
| ३ | तहसिलदार | तालुका | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी | छावणी परिषद | सदस्य |
| ५ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | तालुका | सदस्य |
| ६ | गटविकास अधिकारी | पंचायत समिती | सदस्य |
| ७ | मुख्याधिकारी | नगर परिषद | सदस्य |
| ८ | तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा परिषद, पुणे | सदस्य सचिव |
| ९ | गट शिक्षण अधिकारी | जिल्हा परिषद, पुणे | सदस्य |
| १० | उप अभियंता | सार्वजनिक बांधकाम, पुणे | सदस्य |

२. ज्या परिसरात नव्याने कोव्हीड-१९ चे बाधीत रुग्ण आढळून आल्यास त्या भागात तात्काळ प्रतिबंधित क्षेत्र घोषित करणेबाबत उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER यांनी कोरोना विषाणू बाधित भागात प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) किंवा सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र ( Micro Containment Zone) घोषित करण्यात यावे. प्रतिबंधित क्षेत्र घोषित करताना सदर परिसरात १ किंवा २ रुग्ण आढळले असताना संपूर्ण परिसर प्रतिबंधित क्षेत्र घोषित करण्यात यावे.

३. सदयस्थितीमध्ये कोरोना १९ विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असल्याने प्रत्येक तालुक्यातुन कोरोना बाधीत रुग्णांच्या संपर्कात आलेल्या सहवासीतांची नमुना तपासणी करणे आवश्यक आहे.सबंधित सर्व यंत्रणांनी आपापल्या कार्यक्षेत्रातुन नमुना तपासणी प्रयोगशाळेत पाठवावे. जास्तीत जास्त तपासणी ही आरटीपीसीआर (RTPCR) चाचणी अंतर्गत करावी. आवश्यकता भासल्यास रॅपीड अॅन्टीजन टेस्ट कराव्यात. यांचे नियोजन तालुका आरोग्य अधिकारी, वैदयकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांनी करावे.

४. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत /नगरपरिषद/नगरपंचायत व छावणीपरिषद हद्दीतील आरोग्य विभागाने कोरोनाचा संसर्ग वाढत असेल त्या भागात किंवा परिसरात टार्गेटेड पद्धतीने तपासण्या कराव्यात. प्रत्येक रुग्णांचे किमान २० तरी संपर्क शोधलेच पाहिजेत. ज्या भागात कोरोनाचा रुग्ण सापडला असेल त्या ठिकाणी निदान मायक्रो सिलिंग तरी करावे. पेशंटच्या घरातील सर्वांची कोविड तपासणी करावी. वेगाने प्रसार करणाऱ्या (सुपर स्प्रेडर) संवर्गातील व्यक्तीची वारंवार तपासणी करुन सकारात्मक चाचणी आल्यास विलगिकरण कक्षात ठेवावे.

५. कोरोना १९ विषाणुच्या अनुषंगाने तालुका स्तरावरील कार्यरत असणारे हॉस्पिटलची पाहणी करुन आवश्यक असणा-या वैदयकिय स्टाफची नियुक्ती करण्यात यावी तसेच अतिरिक्त लागणा-या स्टाफची यादी तयार करुन गरजेनुसार नियुक्ती करावी. वाढती रुग्ण संख्या विचारात घेवुन संबंधित आवश्यक कोव्हिड केअर सेंटर, कोव्हिड हॉस्पीटल, कोव्हिड केअर हॉस्पीटलमध्ये पुरेशा खाटा उपलब्ध राहतील, सर्व उपकरणे सुस्थितीत असतील याची खातरजमा संबंधीतांनी करावी.

६. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील नगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत/ ग्रामपंचायत तसेच छावणी परिषद हद्दीतील पॉझिटिव्ह रुग्ण आलेला परिसर प्रतिबंधित क्षेत्र (कंटेनमेंट झोन) घोषित करणेची कार्यवाही संबधित Incident Commander यांनी करावी. तसेच संबधित ठिकाण निर्जंतुकीकरण स्थानिक स्वराज्य संस्थेने करावे. जेणेकरुन संसर्गाचा प्रसार रोखणे सोपे होईल.

७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी जि. प. पुणे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन यांचे समवेत सर्व खाजगी प्रक्टिस करणा-या डॉक्टरांशी समन्वय साधुन ज्या रुग्णांना सर्दी, ताप, खोकला अशी लक्षणे असतील व त्यांना असे वाटत असेल की रुग्णाला कोव्हिड-१९ रोगाची प्राथमिक लक्षणे दिसून येत आहेत तर त्यांनी अशा रुग्णांना ताबडतोब कोव्हिड-१९ ची टेस्ट करुन घेण्यासंबंधीच्या सूचना द्याव्यात. तसेच जिल्ह्यास उपलब्ध असलेले सर्व व्हेंटिलेटर्स चालू आहेत किंवा कसे याची खात्री करून घ्यावी. सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर ठेवणे, ठराविक अंतराने, हात साबणाने स्वच्छ धुणे याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

८. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी हॉटेल, बार , रेस्टॉरेन्ट , परमिट रुम, व अवैद्य दारु धंदे व हातभट्टी इत्यादी वर देखरेख करणेसाठी विशेष भरारी पथक नेमुन कोरोना १९ विषाणुच्या उपाय योजना करणेच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

९. कोरोना १९ विषाणुच्या उपाय योजना करुन हॉटेल, रेस्टॉरंन्ट, लॉज, बार, इत्यादी **आस्थापना रात्री ११.०० वाजेपर्यत** सुरु ठेवण्याची मुभा देण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्गावरील ज्या हॉटेल, ढाबा, रेस्टॉरंन्ट यांना २४ तास चालविण्याची परवानगी आहे अशा हॉटेलबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी महसुल व पोलीस यांनी तपासणी करुन सदर हॉटेल चालु ठेवण्याबाबत कोरोना १९ विषाणुच्या उपाय योजना करणेच्या अनुषंगाने संयुक्त स्वाक्षरीने आदेश देण्यात यावा.

१०. पुणे जिल्हयात कोव्हिड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हयातील **शाळा / महाविदयालये /सर्व खाजगी क्लासेस व इतर दि.२२/०२/२०२१ ते दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत** बंद ठेवण्यात येत आहे. मात्र ऑनलाईन पध्दतीने शाळा सुरु राहतील तसेच पुणे जिल्हयात १० वी व १२ वी च्या विदयार्थ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी संबधित शिक्षणाधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांनी आवश्यक **त्या उपाययोजना कराव्यात. नियोजित परिक्षा आवश्यक असल्यास कोरोना १९ विषाणुच्या उपाय योजनांचे पालन करुन घेण्यात याव्यात. शक्यतो ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात याव्यात.**

११. ग्रामीण कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत /नगरपरिषद/नगरपंचायत व छावणीपरिषद कार्यक्षेत्रातील **आठवडे बाजार, भाजी मंडई, दुकानदार** यामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या SOP प्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी. ज्या ठिकाणी जास्त गर्दी होत आहे व जागा अपुरी पडत आहे अशा ठिकाणी वरील समितीने निर्णय घेऊन संबंधित आठवडे बाजार , भाजी मंडई, दुकानदार यांना नियमावली घालुन देण्यात यावी. व त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

१२. ग्रामपंचायत /नगरपरिषद/नगरपंचायत व छावणीपरिषद कार्यक्षेत्रातील संबंधित आस्थापनांनी त्यांचे कार्यक्षेत्रात मास्क परिधान न करणा-या व्यक्ती , सामाजिक अंतर न ठेवणा-या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करावी. सार्वजनिक ठिकाणी नाक व तोंडावर मास्क न वापरणा-या व्यक्तीवर **रु.५००/-** एवढा दंड आकारावा.

१३. सर्व आगार प्रमुख, राज्य परिवहन महामंडळ जिल्हा पुणे यांनी बस स्थानकांवर तसेच बसेस मध्ये प्रवाशांकडून मास्कचा वापर व कोव्हीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन होण्याकरिता आवश्यक कार्यवाही करावी आणि बसेसच्या चालक व वाहकांनाही त्याअनुषंगाने आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

१४. शासकीय कार्यालयांमध्ये अभ्यागतांची गर्दी होऊ नये त्याअनुषंगाने सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांनी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करावी. सदर नोडल अधिकारी यांनी कार्यालयामध्ये येणा-या अभ्यागतांना पुन्हा दुस-या दिवशी कार्यालयामध्ये येण्याची आवश्यकता भासू नये व कार्यालयामध्ये अभ्यागतांची गर्दी होऊ नये याअनुषंगाने त्यांची निवेदने ,अर्ज यांवर तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी.

१५. सद्यस्थितीत सार्वजनिक परिवहन व्यवस्था (रेल्वे, बस इ) द्वारे प्रवाशांची जिल्हांतर्गत तसेच आंतरजिल्हा / आंतरराज्य आवक-जावक सुरू झालेली असल्याने अशा प्रकारे प्रवास करुन आलेल्या प्रवाशांनी ताप, सर्दी, खोकला इ. कोव्हिड-१९ सदृश लक्षणे दिसून आल्यास तात्काळ स्वत:हून गृह विलगीकरणात (Home Quarantine) रहावे व तात्काळ कोव्हिड-१९ ची चाचणी करुन घ्यावी.

- लग्न समारंभ व इतर कार्यक्रमांच्या अनुषंगाने हॉलच्या क्षमतेच्या मर्यादित ५०% उपस्थिती परंतु **२००** व्यक्तींपेक्षा जास्त असणार नाही असा उपस्थितीमध्ये कार्यक्रम करण्यात यावा. कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी संबंधीत पोलीस स्टेशन मधून रितसर परवानगी घेणे अनिवार्य राहील. लग्न समारंभाचे ठिकाणी उपस्थित सर्व नागरिक, वाढपी, आचारी, वाजंत्री, भटजी व वऱ्हाडी मंडळी यांनी मास्क वापरणे बंधनकारक राहील.
- लग्न समारंभासाठी विनावातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल / खुले लॉन./ सभागृह वापरणेत यावी. कोणत्याही परिस्थीतीत वातानुकूलित सेवेचा ( AC) चा वापर करणेत येऊ नये.

- मंगल कार्यालय व्यवस्थापक / मालक यांनी लग्न समारंभाचे प्रवेशव्दाराजवळ ऑक्सीमीटर, इन्फ्रा थर्मामीटर (थर्मल स्कॅनिंग गन) चा वापर करावा. प्रवेशव्दाराजवळ उपस्थितांचे नाव, मोबाईल क्र व स्वाक्षरी घेण्यात यावी.
- लग्न समारंभाची जागा, वारंवार हाताळले जाणारे भाग, खुर्च्या, लग्नाचा संपूर्ण हॉल, किचन, जेवणाचे ठिकाण, स्वच्छतागृह इत्यादी ठिकाणी सॅनिटायझरचा वापर करुन वारंवार निर्जतुकीकरण करावे. तसेच स्वच्छतागृहात हात धुण्यासाठी सावणाची व्यवस्था करावी.
- लग्न समारंभात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व सर्व नियम व अटी पालन करण्याबाबत जनजागृती करावी.
- लग्नसोहळयाचा सर्व विधीची पाहणी करण्यासाठी पोलीस पाटील, ग्रामसेवक, कामगार तलाठी व पोलीस यांचे भरारी पथक कार्यरत करावे. या ठिकाणी नियमांचे उलंघन झाल्यास गुन्हे दाखल करावेत.
- विवाह समारंभ व अन्य कार्यक्रम झाल्यानंतर चित्रीकरणाची सीडी पाच दिवसात पोलीस ठाण्यामध्ये सादर करावी.

**१६. ग्रामीण कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत /नगरपरिषद/नगरपंचायत व छावणीपरिषद कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणुची प्रभावी उपाययोजनेसाठी अत्यावश्यक सेवा (वृत्तपत्र, दुध, भाजीपाला, फळे, औषधे, हॉस्पिटल, आरोग्य विषयक सेवा वगळता) रात्री ११.०० ते सकाळी ६.०० पर्यत संचार करणेस प्रतिबंध राहील.**

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी उल्लवन केल्यास त्यांचे विरुदध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि साथरोग कायदा, १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे इतर अधिनियम व नियमान्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 22/०२/२०२१ पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.**

**(डॉ. राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

प्रत:-

१. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तन रायिगय सादर,
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२. पोलीस अधीक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
३. उपवनसंरक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४. जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र.जि. का. पुणे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना व्यापक प्रसिध्दीसाठी
१०. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
११. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा..जि. प. पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१२. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१३. असिस्टंट इंन्सिडंट कमांडर तथा तासुका दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१५. मुख्य कार्याकारी अधिकारी छावणी परिषद, मुख्याधिकारी सर्व नगर परिषद, नगरपालिका, नगर पंचायत जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१६. सर्व संबंधितास आस्थापना प्रमुख यांना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अनुपालनास्तव,